अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# कृपया विद्यार्थ्यांना वेठीला धरू नका

राज्यातील जवळपास बारा लाख विद्यार्थ्यांची बारावीची परीक्षा सुरू झाली आहे. ही संख्या म्हणजेच तेवढ्या उत्तरपत्रिका तपासण्याची तेवढीच मोठी आणि वेगवान यंत्रणा त्यासाठी काम करत असते. परंतु यावेळेला शिक्षकांनी पेपर तपासण्याच्या कामावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतल्यामुळे या बारा लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य एका अर्थी टांगणीला लागले आहे. आपल्या वेगवेगळ्या मागण्यांसाठी त्यांना बहिष्काराचा मार्ग अवलंबावा लागला. याचा अर्थ सरकारनेदेखील त्यांच्या या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. सरकारच्या हेही लक्षात आले नाही की, जर शिक्षकांच्या या मागण्यांबाबत आपण चालढकल केली तर त्याचा परिणाम दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांवर होईल. दहावी आणि बारावी हे दोन वर्षे विद्यार्थ्यांच्या जीवनातला अत्यंत महत्त्वाचा कालावधी असतो. पुढच्या करियरच्या निश्चितीसाठी विद्यार्थी आणि पालकसुध्दा यासाठी कष्ट घेत असतात. पुढच्या आयुष्याचे वळण निश्चित करणारी ही दोन वर्षे असल्याने त्यांचे निकाल वेळेवर लागणे अत्यंत आवश्यक ठरते. दुर्दैवाने सरकारच्या लक्षात ही नाजूक बाब आलेली दिसत नाही. कदाचित शिक्षकांनी आडमुठेपणा केला असे गृहित धरले तरी सरकारने हा प्रश्न प्रतिष्ठेचा न करता बारा लाख विद्यार्थ्यांच्या हितासाठी सामोपचाराने सोडवला पाहिजे. आता परीक्षा सुरू झाल्या आणि उत्तरपत्रिका तपासण्याच्या वेळापत्रकाप्रमाणे त्या संबंधित परीक्षकाकडे पोहचवण्याचे कामही सुरू व्हायला हवे. परंतु बहिष्काराच्या या आंदोलनामुळे उत्तर पत्रिकांचे गठ्ठे पडून राहतील आणि एकूणच त्याचा निकालावर परिणाम होईल. बारावीचा निकाल साधारणपणे जूनच्या पहिल्या आठवड्यात लागतो. सरकारने जर पुरेशी खबरदारी घेतली नाही तर मात्र, हे निकाल तब्बल महिनाभर लांबण्याचीही शक्यता आहे. सध्याची शिक्षकांची बहिष्काराची तयारी आणि सरकारचे वेळकाढूपणाचे धोरण या दोन्ही गोष्टी बघितल्या तर कोणीच जबाबदारपणे वागायला तयार नाही असेच दिसून येते. दहावी-बारावीसारख्या महत्त्वाच्या परीक्षांच्या वेळी विद्यार्थ्यांना वेठीला धरण्याचे या दोघांचेही धोरण अत्यंत अनुचित आहे यात काही शंका उरत नाही. अजूनही वेळ गेलेली नाही. सरकारने आणि परीक्षा नियंत्रक मंडळाने शिक्षक संघटनांशी तातडीने चर्चा करुन मार्ग काढला पाहिजे आणि या संघटनांनी देखील अगदीच आपल्या भूमिकेवर ठाम न राहता तडजोड स्वीकारून दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचे नुकसान टाळले पाहिजे.

### शिक्षक जबाबदार घटक

समाजामध्ये शिक्षण आणि शिक्षक या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या आणि तितक्याच आदराच्या असतात. एखाद्या देशाची एकूणच प्रतिष्ठा आणि सभ्यता तिथल्या शिक्षण व्यवस्थेतून सहजपणे ओळखता येते. भारताची शिक्षण व्यवस्था आज अगदी जागतिक दर्जाची जरी नसली तरी तिथल्या स्पर्धेत उतरू शकणारी आहे यात काही शंका नाही. मुळातच आपल्या देशात शिक्षण या क्षेत्राला असलेले पावित्र्य नेहमीच महत्त्वाचे मानले गेले आणि शिक्षकांविषयी विद्यार्थ्यांमध्ये समाजामध्ये नेहमीच आदराची भावना व्यक्त होत असते. अशा परिस्थितीत शिक्षकांनीसुध्दा आपल्या मागण्यांचा विचार करताना विद्यार्थी वेठीला धरला जाणार नाही, याला प्राधान्य दिले पाहिजे. त्यांच्या मागण्यांकडे सरकार वारंवार दुर्लक्ष करत असेल तर त्यांनी परीक्षांची कालावधी सोडून इतर वेळेला आंदोलनाचे जे जे मार्ग त्यांना उपलब्ध असतील ते त्यांनी जरूर वापरावेत. परंतु, परीक्षेच्या वेळेला त्यांच्याकडून अधिक जबाबदारपणाची अपेक्षा असते. कारण वर्षभर केलेल्या अभ्यासाचा अंतिम निर्णय या परीक्षांमधून लागत असतो. प्रामुख्याने दहावी-बारावी किंवा महाविद्यालयातल्या परीक्षा या विद्यार्थ्यांच्या जीवनाशी थेट निगडीत असतात. वर्षभरातल्या शिक्षणासाठी पालकांनी अक्षरश: लाखो रुपये खर्च केलेले असतात. त्या सगळ्या वेळापत्रकाप्रमाणे अभ्यास परीक्षा आणि त्यांचे निकाल याला त्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्व असते. गेल्या दहा वर्षांपासून शिक्षण क्षेत्रामध्ये एक वेगळी क्रांती होत आहे. दहावी-बारावीच्या वर्षात आपल्या पाल्याला ध्येय निश्चित करता यावे म्हणून अगदी आठवी-नववीपासूनच त्याची तयारी सुरू होते. विशेषत:, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना अगदी जागतिक स्तराच्या शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेता यावा म्हणून पालक आणि विद्यार्थी अतोनात कष्ट घेत असतात. या सगळ्या बदलत्या परिस्थितीमध्ये जर शिक्षण व्यवस्थेत अत्यंत महत्त्वाचे आणि मानाचे स्थान असलेला शिक्षक बहिष्कारासारखे खरे सांगायचे तर पोरकट आंदोलन करीत असतील, तर त्यामुळे शिक्षकांचीच प्रतिष्ठा कमी होते, असे आम्हाला वाटते. त्यांच्या मागण्यांविषयी पूर्ण सहानुभूती असूनही विद्यार्थ्यांना आणि विशेषत: परीक्षांच्या वेळेला त्यांनी घेतलेला हा निर्णय तितकासा पटणारा ठरत नाही.

### सरकारचे दिरंगाईचे धोरण

आपल्या सरकारी कारभाराविषयी बोलायलाच जागा उरत नाही. राजकारण, सत्ता, खुर्ची आणि भ्रष्टाचारामध्ये गुंग असलेल्या सत्ताधाऱ्यांना अनेक महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. दहावी-बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक दहा-बारा महिने आधी जाहीर होत असते. त्यामागे निकाल वेळेवर लागावेत, हाच त्यामागचा उद्देश असतो. खरे तर दहावी बारावीच्या परीक्षा उत्तम रीतीने पार पाडणे आणि अधिकाधिक विद्यार्थी त्यात उत्तीर्ण होणे ही गोष्ट राज्य सरकारच्या दृष्टीनेसुध्दा सन्मानाची ठरू शकते. शिक्षकांनी सुरुवातीला तर परीक्षांच्या कामावरही बहिष्कार टाकण्याचे ठरवले होते. परंतु त्यामुळे विद्यार्थ्यांचे अधिक नुकसान होईल, या जाणीवेने त्यांनी हा बहिष्कार मागे घेतला आणि परीक्षांवरचा बहिष्कार कायम ठेवला. गेल्या सहा महिन्यांपासून शिक्षकांच्या मागण्यांबाबत सरकारकडे पाठपुरावा सुरू आहे. त्यातले काही निर्णय सरकारने जरी घेतले असले तरी प्रामुख्याने शिक्षक भरतीवरची बंदी उठवणे, विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांचा सेवाकाल ज्येष्ठतेसाठी मान्य करणे अशा काही मागण्यांबाबत निर्णय झालेले नाहीत. म्हणूनच शिक्षकांना नाईलाजाने हा मार्ग स्वीकारावा लागला आहे. त्याला सरकारचे दिरंगाईचे धोरणच कारणीभूत ठरते. आतादेखील सरकारने विद्यार्थ्यांच्या हितासाठी शिक्षकांशी तातडीने चर्चा करावी.